## व्यावसायिक जीवनात यशस्वी होण्यासाठी संभाषण कौशल्य गरजेचे : डॉ. साबिहा फरास




अग्रणी महाविद्यालय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ.सबीहा फरास सोबत प्रा. एच. एस. शिरसट, डॉ. सत्यनारायण आरडे, डॉ.विजयकुमार पाटील, प्रोफेसर डॉ. बी. एन. रावण, डॉ. एस. एस. कुरलीकर,प्रा.पी.डी.माने

जागतिकीकरणाच्या युगात आपल्याला पुढे जावयाचे असेल तर आपल्याकडे संभाषण कौशल्य असणे आवश्यक आहे. वैयक्तिक आणि व्यावसायिक जीवनामध्ये यशस्वी व्हावयाचे असेल तर आपल्याकडे चांगले संभाषण कौशल्य असणे गरजेचे आहे.यासाठी विद्यार्थ्यांनी भाषेचे ज्ञान,भाषेमधील चढउतार,उच्चार कौशल्ये आत्मसात करावीत असे प्रतिपादन राजर्षी छत्रपती शाहू कॉलेज,कोल्हापूर येथील इंग्रजी विभाग प्रमुख सहयोगी प्राध्यापक डॉ.सबीहा फरास यांनी केले.

श्रीपतराव चौगुले आर्ट्स ॲण्ड सायन्स कॉलेज,माळवाडी-कोतोली येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष व अग्रणी महाविद्यालय योजना समिती अंतर्गत " संभाषण कौशल्य : रोजगाराच्या संधी " या विषयावर आयोजित केलेल्या एक दिवसीय कार्यशाळेत मार्गदर्शन करताना डॉ.सबीहा फरास बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.विजयकुमार पाटील होते.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन मान्यवरांच्या हस्ते वृक्षाला पाणी घालून करण्यात आले.

यावेळी कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालय,वारणानगर येथील सहा.प्राध्यापक डॉ.सत्यनारायण आरडे यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून संस्था सचिव शिवाजीराव पाटील,अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक प्रोफेसर डॉ. बी. एन .रावण,ॲक्टिव्हिटी प्रमुख डॉ.एस. एस. कुरलीकर होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व स्वागत प्रा.एच.एस.शिरसट यांनी केले पाहुण्यांची ओळख डॉ.मनिषा पाटील यांनी करुन दिली आभार प्रा.एच.आर.पाटील यांनी मानले तर सूत्रसंचालन प्रा.पी.डी.माने यांनी केले.

कार्यक्रमास विविध महाविद्यालयातील अग्रणी महाविद्यालय समन्वयक,शिक्षक, कर्मचारी,विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.